CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


No:- CGRF/AZ/AUR/U/ 440 / 2013 /24 / Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

02) The Dy.General Manager(Planning)
GTL Co. Ltd. Franchise of MSEDCL,
Chikalthana, Aurangabad.

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Prakash Baburao Kale, Plot No.1, Vikas Nagar, Osmanpura, Aurangabad.
( Consumer No. 4900 1904 2910 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of Prakash Baburao Kale, Plot No.1, Vikas Nagar, Osmanpura, Aurangabad.

You are requested to Redress the grievance or submit your para wise reply at the time of hearing. The hearing in the matter will be held on 04.06.2013 at 11.30 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-

Prakash Baburao Kale,
Plot No.1, Vikas Nagar,
Osmanpura,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/४४०/२०१३/२४

तक्रार दाखल दिनांक :- १४/०५/२०१३
निकाल दिनांक :- २७/०८/२०१३

श्री प्रकाश बाबुराप काळे,
प्लॉट नंबर ०१,विकास नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद
(ग्राहक क्र.४९००१९०४२९१०) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग व जीटीएल कंपनी औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही. बी. मंत्री | अध्यक्ष |
| | एस.के.नरवडे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १४/०५/२०१३ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी, व जीटीएल कंपनी औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०४/०६/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाने डिसेबर २००६ मध्ये गैरअर्जदार क्रमांक १ यांच्याकडुन व्यावसायिक कारणासाठी (100 KVA demand ) वीज पुरवठा घेतला आहे. डिसेंबर २००६ ते डिसेंबर २०१० या कालावधीत त्यांनी स्पेन्सर डेली यांना लीजतत्वावर ही जागा वापरावयास दिली. स्पेन्सर डेली यांनी सदरील जागा डिसेबर २०१० मध्ये रिकामी केल्यानंतर ती ऑक्टोबर २०१२ पर्यत रिकामी होती नोव्हेबर २०१२ पासुन सदरील जागा पंजाब बॅकेस देण्यात आली.त्यामुळे डिसेंबर २०१० ते नोव्हेबर २०१२ या कालावधीत वीज वापर नसल्याचे अर्जदाराचे म्हणने आहे.

२) गैरअर्जदार क्रमांक २ यांनी अर्जदारास डिसेबर २०१२ व जानेवारी २०१३ या दोन महीन्यासाठी २८३४ युनिट वीज वापराचे सरासरीवर आधारीत वीज बिल दिले तसेच त्यांचा वाढीव भार 100 KVA वरुन 40 KVA करतांना वाढीव रक्कमेची व अतिरिक्त अटीची पुर्तता करण्याची मागणी दिनांक १४/०३/२०१३ च्या मंजुरी आदेशात केली आहे. अर्जदारास देण्यात आलेल्या सरासरीवर आधारीत वरील दोन महीन्याच्या वीज बिलात पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी सुट देण्यात आली नसल्याचे तसेच सुरक्षा रक्कमेवर व्याज देण्यात आले नसल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे. गैरअर्जदार यांना वरील त्रुटीची पुर्तता करण्याची व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई देण्याची विनंती अर्जदाराने मंचास केली आहे.

३) गैरअर्जदार क्रमांक १ यांनी अर्जदाराची वीज बिलाबाबत तसेच KVA भार कमी करण्याबाबतची तक्रार ही गैरअर्जदार क्रमांक २ यांच्याशी संबंधित असल्याचे आपल्या जवाबात म्हटले आहे.अर्जदाराने रुपये १,१९,९५०/- सुरक्षा रक्कम भरली असल्याचे सांगत त्यांना २००९ सालापासून तांत्रिक चुकीमुळे व्याज देण्यात आले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे, व ही रक्कम देण्याची तयारी दर्शविली आहे.

४) गैरअर्जदार क्रमांक २ यांनी मंचात दाखल केलेल्या जवाबानुसार दिनांक १९/१२/२०१२ रोजी त्याच्यातर्फे अर्जदाराच्या मीटरचे निरिक्षण करण्यात आले, तेव्हा मीटर जळालेले व मीटर वर डिस्प्ले दिसत नसल्याचे आढळुन आले. तसेच अर्जदार तेथे वीज वापर करीत असल्याचे दिसुन आले. मीटर जळाले असल्यामुळे त्याची चाचणी करणे शक्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. अर्जदाराच्या वीज उभारणीची व मीटरवरील भाराची नोद केल्यानंतर तपासणी केल्यानंतर त्यांना सरासरीवर आधारीत २८३४ युनिट वीज वापराचे

वीज बिल देण्यात आले जे योग्य असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे.अर्जदारास सरासरीवर वीज बिल आकारणी करतांना पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी सुट याची रक्कम लक्षात घेवुन सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आले असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे. अर्जदारास त्यांचा वाढीव भार 100 KVA वरुन 40 KVA करतांना मागणी केलेली रक्कम तसेच मागणी पत्रात नमुद केलेल्या अटी योग्य असल्याचे सांगत अर्जदाराची तक्रार खारीज करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

५) अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ व २ मंचात दाखल केलेल्या कागद पत्रावरुन तसेच मंचासमोर झालेल्या सुनावणी दरम्यान असे आढळुन येते की अर्जदाराची तक्रार ही खालील चार वेगवेगळ्या प्रकरणाशी संबंधित आहे. या सर्व मुद्याचा सखोल अभ्यास केल्यावर मंच खालील प्रमाणे आपले निरिक्षण नोदवित आहे.

मुद्दा क्रमांक १ डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३ या दोन महीन्याचे सरासरीवर आधारीत वीज बिल :-

गैरअर्जदार क्रमांक २ यांनी अर्जदाराचे मीटर जळाले असल्यामुळे डिसेबर २०१२ व जानेवरी २०१३ या दोन महीन्याचे सससरीवर आधारीत २८३४ युनिट प्रति माह वीज वापराचे बिल आकारले आहे. सुनावणी दरम्यान अर्जदाराचे प्रतिनिधी श्री हेमंत कापडीया यांनी महावितरण कंपनीच्या चाचणी विभागात मीटर टेस्ट करुन किंवा एमआरआय वरुन मीटर रिडींग नोंद घेण्यात यावी व त्या प्रमाणे वीज बिल आकारणी करण्याची विनंती मंचास केली. गैरअर्जदार क्रमांक २ यांनी सदरील बदलण्यात आलेले मीटर सापडत नसल्यामुळे टेस्टिंग करणे शक्य नसल्याचे सांगितले. अर्जदाराने नोव्हेबर २०१२ पासुन पंजाब बॅकेस ती जागा दिलेली असुन तेथे वीज वापर होत असल्याचे मान्य केले आहे. नोव्हेंबर २०१२ च्या पुर्वी त्या जागी वीज वापर होत नसल्यामुळे मागील वीज वापराच्या आधारावर वीज बिलाची आकारणी करणे चुकीचे ठरेल म्हणुन अर्जदाराचा पुढील कालावधीचा वीज वापर लक्षात घेता गैरअर्जदार क्रमांक २ यांनी सरासरीवर आकारणी केलेले २८३४ युनिट वीज वापराचे वीज बिल योग्य असल्याचे मंचाचे मत आहे. गैरअर्जदार क्रमांक २ यांनी भविष्यात वीज ग्राहकाचा मीटर बाबत वाद असल्यास मीटर तपासणीसाठी उपलब्ध करुन देतील अशी अपेक्षा मंच व्यक्त करते.

मुद्दा क्रमांक २ गैरअर्जदार क्र. २ यांच्या दिनांक १४/३/१३ चा वीज भार कमी करण्याच्या मागणी पत्राबाबत :-

अर्जदाराने त्याचा १०० केव्हीए चा भार कमी करुन तो ४० केव्हीए करावा असा अर्ज गैरअर्जदार क्र. २

यांना सप्टेंबर २०१२ रोजी दिला होता. गैरअर्जदार क्रमांक २ यांनी पत्र क्रमांक ९३२ दिनांक १४/०३/२०१३ द्वारे अर्जदारास खालील रक्कमेची मागणी केलेली दिसुन येते.

| | |
|---|---|
| १) Testing Charges :- | Rs. 1,000/- |
| २) Processing Charges : | Rs. 100/- |
| ३) LT metering box with CTR 100/5A with MCCB | Rs 22,500/- |
| Total : | Rs. 23,600/- |

अर्जदारातर्फे श्री हेमंत कापडीया यांनी गैरअर्जदार क्रमांक २ यांनी मागणी केलेली ही रक्कम महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्य केलेल्या दराप्रमाणे नसल्याचे तसेच मीटरिंग हे महावितरण कंपनीतर्फे देण्याचे आयोगाचे आदेश असल्याचे मंचासमोर सुनावणी दरम्यान सांगितले. गैरअर्जदार क्रमांक २ यांनी एल.टी. मिटरिंगची रुपये २२,५,००/- रद्द करण्याची तयारी दर्शवली. अर्जदाराने देखील एल.टी.मिटरिंगची रुपये २२,५,००/-वजा केल्यास उर्वरित रक्कम रुपये १,१००/- भरण्याची तयारी दर्शविली. अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक २ यांच्यात या मुद्द्यावर समझोता झालेला असल्यामुळे मंच या प्रकरणी आदेश पारीत करीत नाही. अर्जदाराने मंचात तक्रार केल्यानंतर गैरअर्जदार क्रमांक २ हे भविष्यात महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्य केलेल्या दराप्रमाणे इतर ग्राहकांना रक्कमेची मागणी करतील अशी अपेक्षा मंच व्यक्त करते.

मुद्दा क्रमांक ३ पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी सुटबाबत :-

गैरअर्जदार क्रमांक २ यांनी अर्जदारास डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३या दोन महिन्याचे सरासरीवर आधारीत २८३४ युनिट प्रति माह वीज वापराचे बिल आकारले आहे.सदरील वीज बिल आकारतांना महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे वीज बिलात पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी सुट देण्यात आली नसल्याची अर्जदाराची तक्रार आहे. अर्जदाराचे मीटर जळाले असल्यामुळे त्याचा पुढील कालावधीचा वीज वापर लक्षात घेवुन सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी केल्याचे गैरअर्जदार क्र.२ यांनी मंचात दाखल केलेल्या आपल्या जवाबात म्हटले आहे. मुद्दा क्र.१ मध्ये अर्जदाराचे मीटर चाचणीसाठी उपलब्ध नसल्यामुळे मंचाने गैरअर्जदार क्र.२ यांनी आकारलेले २८३४ युनिट वीज वापर योग्य असल्याचे म्हणने मान्य केलेले आहे, परंतु या वीज वापरावर आयोगाच्या आदेशाप्रमाणे

पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी सुट देण्यात आलेली दिसुन येत नाही.त्यामुळे अर्जदार ही सुट मिळण्यास पात्र आहे असे मंचाचे मत आहे. अर्जदाराने सुनावणी दरम्यान मीटर बदलण्यात आल्यानंतरची ५ महीन्याची ( फेब्रुवारी २०१३ ते जुलै २०१३) वीज बिल दाखल केली आहेत. या वीज बिलाचे निरिक्षण केल्यानंतर अर्जदाराचा पॉवर फॅक्टर हा युनिटी असल्याचे दिसुन येते, त्यामुळे अर्जदार हे पॉवर फॅक्टर पोटी आयोगाच्या आदेशानुसार सुट मिळण्यास पात्र असल्याचे मंचाचे मत आहे. त्याप्रमाणे वरील पाच महीन्याच्या वीज बिलात अर्जदारास टीओडी वर मिळणारी सुट ही सरासरी रुपये १,२४०/- अशी असल्याचे दिसुन येते.त्यामुळे डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३ या दोन महीन्याच्या वीज बिलात या रक्कमेची सुट देणे न्यायसूचक ठरेल असे मंचाचे मत आहे.

मुद्दा क्र.४ सुरक्षा रक्कमेवरी व्याजा बाबत ः-

गैरअर्जदार क्र.१ यांनी आपल्या जवाबात अर्जदाराने रुपये १,१९,९,५०/- सुरक्षा रक्कम म्हणून भरली असल्याचे तसेच २००९ सालापासून त्यावर व्याज दिले नसल्याचे मान्य केले आहे. मिळणा-या व्याजावर अर्जदारास टी.डी.एस. प्रमाण पत्र देखील देण्यात आल नसल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ यांच्या या सेवेतील त्रुटी मुळे अर्जदाराचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे स्पष्ट होते.

## आदेश

१) अर्जदाराची तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.२ यांनी अर्जदारास ३० दिवसात वीज बिल द्यावे, ज्यात सुरक्षा रक्कमेवरील २००९ सालापासूनचे व्याज वजा करावे तसेच डिसेबर २०१२ व जानेवारी २०१३ या दोन महीन्यासाठी आकारलेल्या वीज बिलातुन पॉवर फॅक्टर व टीओडी वर मिळणारी (मुद्दा क्र.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे) रक्कम वजा करण्यात यावी.

३) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारु नये

४) गैरअर्जदार यांनी संयुक्तपणे सेवेतील त्रुटी पोटी अर्जदारास झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १५००/- तीस दिवसांच्या आत द्यावे.

५) वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| एस. के. नरवडे | विलासचंद्र सु. काबरा | व्हि.बी.मंत्री |
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.
AURANGABAD ZONE AURANGABAD.
.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172

No. CGRF/AZ/Aur/U/440/2013/24 Date :-

To,

01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

02) The Dy .General Manager(Planning)
GTL Ltd., MIDC, Chikalthana,
Aurangabad.

**03)** Prakash Baburao Kale,
Plot No.1, Vikas Nagar,
Osmanpura,
Aurangabad.

( Consumer No 490019042910 )

Sub:- Grievance in Case No. CGRF/AZ/Aur/U/ 440 /2013/24

Please find enclosed herewith a copy of the order passed by the Forum in the case mentioned above. The consumer, if not satisfied with the decision of the Forum, is at liberty to make a representation to the Electricity Ombudsman, the contact details of whom is as under, within a period of 60 days from the date of this order.

Member/Secretary,
CGRF(AZ) MSEDCL,
Aurangabad

Encl: As above

Copy submitted with respect to:-

The Chief Engineer(AZ)
MSEDCL, Aurangabad.

Contact details of:
The Electricity Ombudsman,
Plot No.12, Shrikrupa, Vijaynagar, Chhaoni, Nagpur – 440 013
Phone No.( Office ) (0712) 20 22 198 (E-mail – cgrfnz@gmail.in )